राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

मंगळवार दि. ०९ ऑक्टोबर २०१८

# विद्यार्थ्यांनी वन्यजीवदूत म्हणून काम करावे-डॉ.लिगाडे

## कर्मवीर हिरे महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा

**गारगोटी, ता.८(प्रतिनिधी)**

वन्यजीव संवर्धनासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष योगदान असणे आवश्यक आहे. यासाठी वन्यजीव, त्यांचा नैसर्गिक अधिवास, त्यांचे पर्यावरण संतुलनातील स्थान, संवर्धनाचे प्रकार, अधिवास नष्ट झाल्याने होणारा मानव आणि वन्यजीव संघर्ष याबाबत समाजात जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी वन्यजीवदूत म्हणून काम करावे, असे आवाहन यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय, सोळांकूरचे डॉ. विश्वजित लगाडे यांनी येथे केले.

ते येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयात आयोजित 'वन्यजीव सप्ताह' कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे होते.



**कर्मवीर हिरे महाविद्यालयात आयोजित वन्यजीव सप्ताह कार्यक्रमात बोलताना डॉ विश्वजीत लगाडे. शेजारी डॉ. डी. जी. नेजकर, प्रा. ए. जे. गोडसे, प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे व डॉ. सागर व्हनाळकर**

यावेळी बोलताना डॉ. विश्वजित लगाडे म्हणाले, जगात दरवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे मरण पावणाऱ्या वन्यजीवापेक्षा अधिक शिकार मानवांकडून होते. केवळ हौस व मौजमजा म्हणून अनेक देशांत प्राणी मारले जातात. अशा विघातक गोष्टींना आळा घालण्यासाठी वन्यजीव कायद्याबरोबर प्रभावी जनजागृती गरजेची आहे.

यावेळी उपप्राचार्य अरुण गोडसे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी वन्यजीवाबाबत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास समाजकार्य विभागप्रमुख डॉ.डी.जी. नेजकर, डॉ. मृणाल देसाई, डॉ. संताजी खोपडे, प्रा. चेतन भगत आदी उपस्थित होते.प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. सागर व्हनाळकर यांनी केले. स्वागत प्रा. श्रुती पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तेहरीन देसाई यांनी केले. आभार डॉ. विलास जगताप यांनी मानले.